# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ७ नोव्हेंबर २०१५

# शिक्षणाबरोबर सक्षमीकरण काळाची गरज

### ‘गाला ४ मलाला-एक शैक्षणिक चळवळ’ महासंवादामध्ये मान्यवरांनी मांडले मत

मुंबई – मुलींच्या शैक्षणिक समस्या ,शैक्षणिक गळती,सुरक्षा तसेच इतर महत्वपूर्ण समस्यांवर तोडगा काढण्यासाठी मुलींच्या शिक्षणाबरोबरच समक्षीकरण व्हावे आणि ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन अनेक मान्यवरांनी आज मुंबई विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या ‘गाला ४ मलाला’ या महासंवादात केले. शिक्षणाच्या हक्कासाठी धार्मिक दहशतवाद्यांचा मुकाबला करणा-या नोबेल पुरस्कार विजेत्या मलाला युसुफझाई यांच्या जीवनावरील ***‘ही नेमड् मी मलाला’*** या चित्रपटाच्या निमित्ताने मुलींच्या शैक्षणिक समस्या ,शैक्षणिक गळती,सुरक्षा तसेच इतर महत्वपूर्ण समस्यांवर मान्यवरांच्या उपस्थितीत *‘गाला फॉर मलाला’* या महासंवादाचे आयोजन मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट परिसरातील दीक्षान्त सभागृहात आयोजित  करण्यात आले होते.

प्रत्येकी १०० टक्के शाळाबाह्य विद्यार्थ्यांपैकी ६२ टक्के मुली आहेत आणि ही भयाण परिस्थीती बदलायची असेल तर सर्वांनी मुलींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पुढाकार घ्यावे लागेल.त्याचबरोबर विशेषकरुन भटक्या विमुक्त जातीमधील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना सक्षम करावे लागेल असेही मान्यवरांनी सांगितले.३५ टक्के बालविवाह,स्त्री भृण हत्या हे पुरोगामी महाराष्ट्राची ओळख होऊ शकत नाही हे चित्र बदलण्याची गरज आहे.जगातील ६६ टक्के मुली या शिक्षणापासून वंचित आहे ही परिस्थीती बदलण्याची खरी गरज असल्याचेही अनेक मान्यवरांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा.ना.श्री विनोद तावडे यांनी दुरध्वनीद्वारे त्यांचे शिक्षण विषयक विचार मांडले.त्यांनी ‘गाला ४ मलाला –एक शैक्षणिक चळवळ’ या उपक्रमाचे अभिनंदन करत महाराष्ट्र शासन मुलींच्या शिक्षणासाठी प्रगतीशील धोरण अवलंबून त्यांना सक्षम करण्यासाठी कटीबध्द  आणि प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख म्हणाले की,समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचणे हे विद्यापीठाचे ध्येय असून त्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठ वाटचाल करीत आहे.मुंबई विद्यापीठात मुलींच्या शिक्षणाचा टक्का हा समाधान कारक असून ६० टक्क्याहून अधिक मुली या मुंबई विद्यापीठात शिकत असून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी आणि कौशल्याधारित शिक्षण देऊन सक्षम करण्यासाठी मुंबई विद्यापीठ सकारात्मक पाऊलं उचलत असल्याचे त्यांनी सांगितले.देशाला अजूनही स्त्रीभृण हत्या,बालविवाह या

समस्या भेडसावत असून यांचे निराकरण करण्यासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न व्हावला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

तर या प्रसंगी उच्च शिक्षण सहसंचालक मुंबई विभाग डॉ.शैलेंद्र देवळणकर यांनी शिक्षणावर आपले विचार मांडतांना अनेक मुद्द्यांना हात घातला.दोन्ही देशांनी मुलींच्या शिक्षणावर पुढाकार घेऊन जागतिक परिस्थीती बदलावी तसेच उच्च शिक्षणात संख्यात्मक आणि गुणात्मक बदल घडवून आणण्यासाठी व ग्रॉस एनरॉलमेंट रेसो वाढविण्यासाठी आणि शिक्षणातील गळती थांबविण्यासाठी शासनस्तरावर अनेक महत्वपूर्ण प्रकल्प हाती घेतले असून येत्या काळात ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीचे ध्येय साध्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

'गाला ४ मलाला' या महासंवादामध्ये महाराष्ट्रातील वंचित बालकांच्या शिक्षणात शिक्षणात पायाभूत स्वरुपाचे काम करणाऱ्या विविध संस्था ,शिक्षणतज्ज्ञ,आव्हानात्मक परिस्थीत शिक्षण घेणा-या मुलींच्या प्रतिनिधी सहभागी झाल्या होते.स्नेहालय,ग्लोबल गिव्हींग,स्नेहालय यु.के.मलाला फंड आदी संस्थांनी या उपक्रमाच्या संयोजनासाठी पुढाकार घेतला होता.या महासंवादामध्ये मॅजिक बस संस्थेचे संस्थापक मॅथ्यू स्पॅसी,मुख्य व्यवस्थापिका मेधा ओक,हेरंब कुलकर्णी ,सबा अली,ग्लोबल गीव्हींग आणि स्नेहालय यु.के. तर्फे श्रीमती मिरांडा हडसन,इंग्लंडमधील महिला शिक्षण आदी शिक्षण आणि संरक्षण विषयांधील ज्येष्ठ अभ्यासू पत्रकार श्रीमती जेन सेल्बी,पद्मश्री पदमजा फेणाणी-जोगळेकर यांनी मुलींच्या शिक्षण विषंयावरील आपले विचार मांडले.

या कार्यक्रमात बालकुमारांसाठी मलालाच्या जीवनावरील 'शिक्षणदुत मलाला' या हेरंब कुलकर्णी लिखीत पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.या पुस्तकाच्या १ लाख प्रती पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील सर्व शाळा आणि वंचित मुलांच्या निवासी संस्थापर्यंत पोहचविले जाणार असल्याचे आयोजकांच्या वतीने डॉ.गिरीश कुलकर्णी, स्नेहालय यांनी सांगितले. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.एम.ए.खान, य़ांनी कार्यक्रमातील उपस्थितांचे स्वागत केले.तर बीसीयुडी संचालक डॉ.अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली होती.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन स्वयंसेवी संस्थातर्फे रोहित परदेशी,अजित कुलकर्णी ,निक स्टाव्हरसन,हॅना कुपर्स,जयवंत गडाख ,अरविंद औताडे,रावसाहेब दुशिंग,आणि अरुण शेठ यांनी केले ,तर संचालिका विद्यार्थी कल्याण विभाग,डॉ.मनाली लोंढे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.एनएसएसचे समन्वयक डॉ.बिडवे यांचे या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष सहयोग लाभले होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)